# सार्वजनिक उपक्रम समिती

## समितीची रचना, कार्यपध्दती व कामे

प्रशासकीय कामांच्या सोयीसाठी शासनाने अनेक शासकीय महामंडळे व कंपन्या स्थापन केलेल्या आहेत. अशी महामंडळे आणि कंपन्या यांच्या भागभांडवलात शासनाचा मोठा (किंवा जवळ-जवळ संपूर्ण) वाटा असतो. सदर महामंडळे व कंपन्या शासनाने नेमलेल्या संचालकांद्वारे चालविण्यात येतात. अशा महामंडळाचे व कंपन्यांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल सभागृहाच्या पटलावर वेळोवेळी ठेवण्यात येतात. त्याचप्रमाणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेही सार्वजनिक उपक्रमासंबंधातील लेखापरीक्षा (सार्वजनिक उपक्रम) अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. सदर अहवालांची छाननी करुन त्यासंबंधीचे आपले अभिप्राय आणि शिफारशींची प्रतिवेदने विधानमंडळास सादर करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक उपक्रम समितीची दिनांक १६ सप्टेंबर, १९६६ मध्ये स्थापना करण्यात आली. सदर समितीचा कालावधी सुरुवातीच्या काही काळात विधानसभेच्या कालावधी इतकाच म्हणजे ५ वर्षाचा होता. नंतर हा कालावधी विधानमंडळाच्या इतर समित्यांप्रमाणे एक वर्षाचा करण्यात आला.

या समितीवर सध्या एकूण २५ सदस्य आहेत. महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २११ व महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २०९ अन्वये मा.अध्यक्ष व मा.सभापती यांचेकडून अनुक्रमे विधानसभेचे २० सदस्य व विधानपरिषदेचे ५ सदस्य असे एकूण २५ सदस्य नामनियुक्त केले जातात.

**सार्वजनिक उपक्रम समितीची रचना - (विधानसभा नियम २११)**

(१) दरवर्षी विधानसभेच्या किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर सार्वजनिक उपक्रम समितीची रचना करण्यात येईल. ही समिती अध्यक्षांनी विधानसभा सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले वीस सदस्य आणि सभापतींनी विधानपरिषद सदस्यांमधून तशाच प्रकारे नामनिर्देशित केलेले पाच सदस्य यांची मिळून होईल.

परंतु, कोणत्याही सार्वजनिक उपक्रमामध्ये ज्यांचा आर्थिक हितसंबंध असेल असा कोणताही सदस्य, समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केला जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही.

(२) समितीचे सदस्य, नवीन समितीची स्थापना होईपर्यंत पद धारण करतील.

**सार्वजनिक उपक्रम समितीची कामे. (विधानसभा नियम २१२)**

(एक) तिसऱ्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेले सार्वजनिक उपक्रम आणि सभागृहांकडून वेळोवेळी ठरविण्यात येतीत असे इतर उपक्रम यांचे अहवाल आणि लेखे तपासणे.

(दोन) उक्त उपक्रमासंबंधी नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे काही अहवाल असल्यास ते तपासणे.

(तीन) उक्त उपक्रमांची स्वायतत्ता आणि कार्यक्षमता यांच्या संदर्भात त्या उपक्रमाचे व्यवहार सुस्थिर व्यापारी तत्वावर आणि दूरदृष्टीच्या वाणिज्य प्रथांनुसार करण्यात येत आहेत किंवा कसे याचे परीक्षण करणे, आणि

(चार) उक्त उपक्रमांच्या बाबतीत लोकलेखा समितीकडे आणि अंदाज समितीकडे विहित केलेली तथापि वरील खंड (एक), (दोन) आणि (तीन) खाली न येणारी आणि अध्यक्ष वेळोवेळी ह्या समितीकडे नेमून देतील अशी इतर कामे.

परंतु समिती खालीलपैकी कोणत्याही बाबींचे परीक्षण किंवा तपासणी करणार नाही.

(एक) उक्त उपक्रमांच्या व्यापारी किंवा वाणिज्य कामाव्यतिरिक्त शासनाच्या प्रमुख धोरणासंबंधीच्या बाबी

(दोन) दैनंदिन प्रशासनाच्या बाबी, आणि

(तीन) कोणत्याही परिनियमान्वये ज्या बाबी विचारात घेण्यासाठी खास यंत्रणा स्थापन करण्यात आली असेल अशा बाबी.

**समितीस सामान्य नियम लागू असणे -** इतर बाबीतीत समितीसंबंधीच्या या सभागृहाच्या कार्यपध्दतीच्या नियमांत अध्यक्ष जे बदल किंवा फेरफार करतील त्यासह ते लागू होतील.